Academic Sports Scholars
International Online Physical Education & Sports Research Journal

ISSN: 2277-3665 Impact Factor : 2.9052(UIF) Volume - 5 | Issue - 3 | March - 2016

# "राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापिठ व गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयातील शारीरीक शिक्षण प्राध्यापकांचे खेळाडूना प्रोत्साहन आणि वैज्ञानिक व तंत्रशुध्द ज्ञानाचा खेळामध्ये वापर यांचे मुल्याकंन" एक अभ्यास



अब्दुल निसार शेख
पदव्युत्तर शारीरिक शिक्षण विभाग, रा.तु.म. नागपूर विद्यापिठ, नागपूर.

**सारांश :–**

खेळ हे व्यायामाचे सर्वात उत्तम साधन आहे. कारण कि ही एक सुखदायी प्रक्रिया आहे. आजच्या आधुनिक व यांत्रिकी जीवनात संशोधनाला विशेष महत्व आणि स्थान आहे.

आजच्या विज्ञान युगी काळात खेळाडूना संघर्ष आणि आव्हान जास्त प्रमाणात झेलावे लागते. त्यामूळे खेळाडूना स्वतःला सिध्द करण्यासाठी पुष्कळ संघर्ष करावे लागते. तरीसुध्दा खेळाडू आपला 100 टक्के प्रदर्शन देवू शकत नाही. आणि हया मुळेच खेळाडूना आपले 100 टक्के प्रदर्शन देण्यासाठी प्रोत्साहनात्मक आणि वैज्ञानिक व तंत्रशुध्द ज्ञानाचा वापर करून खेळाडूना सर्वागीण विकास घडविण्याची आवश्यकता आहे.

या संशोधनाकरीता संशोधन कर्त्याने 300 शारीरिक शिक्षण प्राध्यापकांची निवड केली आहे आणि साधा यदुच्छिक (imple randam sampling) संशोधन पध्दतीचा वापर करण्यात आले आहे. आणि मुल्यमापनासाठी प्रश्नावली आणि मुलाखत पध्दतीचा सांख्यिकीय विश्लेषण करून त्याचे मुल्यमापन करण्यात आले आहे. आणि प्राप्त आकडयांचे सांख्यिकीय विश्लेषण हे सारणी आणि आलेखाव्दारे प्रस्तूत करण्यात आले आहे. स्मअमस वॅिपहदपपिबंदबम 0.05 ही ठेवण्यात आली आहे.

**कळशब्द :** संकलन, प्रोत्साहन, तंत्रशुध्द, विश्लेषण, अंतकरणात

***प्रस्तावना :—***

भारत हा लोकसंख्येनुसार जगातील दुसरा सर्वात मोठा देश आहे. पण भारतातील खेळाडूंची संख्या मात्र बोटावर मोजण्याइतकी उरली आहे. हयामध्ये काही अतिशयोक्ती वाटत नाही. पश्चिमी राष्ट्र उदा. अमेरिका, चीन, इंग्लंड, ऑस्ट्रेलिया यांच्या तुलनेत आपले देशाचे निम्न टक्के प्रदर्शन सुध्दा साध्य करीत नाही. यांच्या मुख्य कारणामधील काही कारणे खालील प्रमाणे सुध्दा आहेत. प्रोत्साहनात्मक कार्यक्रम किंवा ज्ञान आणि वैज्ञानिक आणि तंत्रशुध्द ज्ञानाचा वापर करण्यात आपण मागे तर नाही. यांचे विश्लेषणात्मक मुल्यमापन करण्याची फार आवश्यकता आहे. विज्ञानाने नवीन जग घडविला आहे आपण खेळामध्ये याचा वापर करण्यास का मागे पुढे बघतो विज्ञानाने प्रत्येक शाखेत नवनवीन संशोधन करून त्याचा विकास घडविण्याची योग्यता स्थापित केली आहे. तर मग खेळामध्ये याचा सहभाग का कमी प्रमाणात होतो.

हया सर्व अशा लहान लहान बाबीवर लक्ष देवून हयांचे विद्यापीठ, राष्ट्रीय स्तरावर ग्रुरूंयांचे संशोधन करून देशाचे प्रदर्शन निम्न स्तरावरून उच्च स्तरापर्यंत पोहोचण्यात भर पडेल. हयासाठी संशोधनकर्त्याने विषय निवडला आहे.

***शिक्षणाचा अर्थ (शिक्षण) :—***

शिक्षण म्हणजे वर्तन बदल होय ''शिक्षण म्हणजे व्यक्तीचा सर्वागीण विकास होय'.

शिक्षणामध्ये मुख्यतः व्यक्तीचा ज्ञान आकलन कौशल्य उपयोजन क्षमता, अभिरूची अभिवृत्ती व रसग्रहण अशा पाच घटकांचा सहभाग असतो. मनुष्य जिवनात शिक्षण ही एक अपरिहार्य गरज, आवश्यकता आहे. व्यापक अर्थाने शिक्षण म्हणजे वर्तन बदल प्रत्येक व्यक्ती आपल्या येणाऱ्या अनुभवानुसार वर्तनात, वागणूकीत व्यवहारात बदल करीत असतो. आणि हा बदल परीवर्तन म्हणजेच शिक्षण होय.

***शारीरीक शिक्षण :—***

शारीरीक ही एक प्रक्रिया आहे. त्याचाच एक अविभाज्य घटक म्हणजे शारीरीक शिक्षण होय.

जे.बी.ॲश म्हणतात

''शारीरीक शिक्षण हे शिक्षणाचा संपुर्ण क्षेत्राचा भाग आहे. आणि त्याचा सबंध पुष्कळ स्नायुप्रक्रियांचा व त्या संबधीत क्रियांबरोबर आहे'' आपले अंतीम लक्ष्य साध्य करण्यासाठी शरीर हेच उत्तम साधन आहे. शारीरीक शिक्षण ही शिक्षणाची मुख्य अशी शाखा म,त्रख,? आहे. म्हणजेच शरीरमार्फत दिले जाणारे शिक्षण म्हणजेच शारीरीक शिक्षण होय.

***षारीरीक शिक्षणाची शैक्षणिक भुमिका :—***

आजही आपल्या देशात साक्षरतेचा प्रमाण 100 टक्के नाही. शिक्षणाच्या प्रत्येक शाखेचा प्रसार शहरापासून ग्रामीण टोकापर्यत पोहचलेला नाही. शारीरिक शिक्षण ही शिक्षणशास्त्राची मुख्य अशी शाखा आहे. शारीरिक शिक्षण म्हणजे व्यक्तीचा सर्वागीण विकास होय. शारीरिक शिक्षणाद्वारे व्यक्तीच्या शारीरिक आणि मानसिक अशा दोन्ही बाबींचा विकास साध्य करता येते. समाजात अंधश्रध्दा निर्मुलन, वैज्ञानिक दृश्टीकोन सुस्पष्टताच ज्ञान हस्तांतरीत करण्याची फार आवश्यकता आहे.

आजच्या वैज्ञानिक युगात करून खेळाडू कुठेही मागे राहू नये यासाठी खेळामध्ये वैज्ञानिक आणि तंत्रशुध्द ज्ञानावर भर टाकण्याची फार आवश्यकता आहे. आणि विविध नवनवीन कार्यक्रम राबवुन प्रोत्साहनात्मक ज्ञानाद्वारे आत्मविश्वास वाढविण्याची फार आवश्यकता आहे. त्यासाठीच खेळाडुंचा सर्वागीण विकास व त्यांच्या सुप्त गुणांचा विकास घडविण्यासाठी शारीरीक शिक्षण या शास्त्राची फार आवश्यकता आहे.

***संशोधनाची आवश्यकता :—***

आजच्या युगात संशोधन हा मनुष्याचा अत्यंत महत्वपूर्ण आवश्यक व रूचीपूर्ण असा विजय आहे. मनुष्य दिवसेंदिवस आपल्या अनुभवनाने नवीन गोष्टीचा शोध लावून नविन ज्ञान संपादित करीत आहे. नविन ज्ञान प्राप्त करीत समाज घडविण्यासाठी संशोधनाची आवश्यकता आहे. जुन्या तथ्यांच्या त्याग करून नवीन तथ्यांचा अविष्कार करणे म्हणजेच संशोधन होय.

***संशोधनाचे महत्व :—***

संशोधनात रा.तु.म. विद्यापिठ नागपूर व गोडंवाना विद्यापीठ गडचिरोली विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयातील शारीरीक शिक्षण प्राध्यापंकाचे खेळाडूना प्रोत्साहन आणि वैज्ञानिक व तंत्रशुध्द ज्ञानाचा खेळामध्ये वापर यांचे मुल्यांकन'' एक अभ्यास

या खेळाडूना प्रोत्साहनात्मक आणि वैज्ञानिक आणि तंत्रशुध्द ज्ञानाचा वापर कितपत आणि कशा प्रकारे होत आहे आणि प्राध्यापक आपला किती टक्के योगदान देत आहेत याची माहिती मिळेल.

***समस्येचे कथन :—***

खेळाडूना नवीन काळानुसार स्पर्धा व संघर्ष फार प्रमाणात आहे. आणि यामध्ये तंत्रशुध्द व परिपक्वता मिळविण्यासाठी व राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर योगदान देण्यासाठी त्यांना प्रोत्साहन आणि वैज्ञानिक व तंत्रशुध्द ज्ञानाचे वापर करण्याची आवश्यकता आहे. आणि हे बघण्यासाठी संशोधनकाने रा.तु.म. नागपूर विद्यापिठ व गोडंवाना विद्यापीठ गडचिरोली विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयातील शारीरीक शिक्षण प्राध्यापकांचे खेळाडूना प्रोत्साहन आणि वैज्ञानिक व तंत्रशुध्द ज्ञानांचा खेळामध्ये वापर यांचे मुल्याकन'' एक अभ्यास हा विषय संशोधनाकरीता निवडला आहे.

***संशोधकार्याची उददीष्टे :—***

1) रा.तु.म. विद्यापिठ नागपूर व गोडंवाना विद्यापीठ गडचिरोली येथील संलग्नित महाविद्यालयात शारीरिक शिक्षण प्राध्यापंकाचे खेळाडूना

खेळाविषयी कितपत प्रोत्साहीत केले जाते आहे यांचे मुल्याकन करावे.

2) रा.तु.म. विद्यापिठ नागपूर व गोडंवाना विद्यापीठ गडचिरोली विद्यापीठाशी संलग्नीत महाविद्यालयातील शारीरिक शिक्षण प्राध्यापकांचे खेळाडूना वैज्ञानिक आणि तंत्रशुध्द बाबीवर कितपत भर देण्यात येत आहे त्यांचे मुल्याकन करणे होय.

### *संशोधन कार्याची परीसीमा :—*

1. या अध्ययनाकरीता वेळ निश्चित करण्यात आलेली नाही.
2. या अध्ययनात प्राध्यपकांच्या व्यवहारावर नियंत्रण नाही.
3. यामध्ये रा.तु.म. विद्यापीठ नागपूर व गोडंवाना विद्यापीठ गडचिरोली येथील 300 शारीरिक शिक्षण प्राध्यापकांचा समावेश करण्यात आला आहे.
4. मुलाखात प्रश्नावली सर्वेक्षण या बाबीवरून मुल्याकंन करण्यात येईल.

### *संशोधन कार्याची सीमा :—*

1. उत्तर दायित्वाचा मानसिक स्थितीवर नियंत्रण नव्हते.
2. महाविद्यालयाची स्थिती व वातावरणावर नियंत्रण नव्हते. रा.तु.म. नागपुर विद्यापिठ व गोडंवाना विद्यापीठातील प्राध्यापंकाचा विचार करण्यात आला आहे.
3. या अध्ययनात महाविद्यालयातील शारीरिक शिक्षण प्राध्यापकांचा खेळाडूना प्रोत्साहन कितपत देण्यात आले आहे यांचा विचार करण्यात आले आहे.

### *संशोधनकर्त्याची परिकल्पना :—*

संशोधनकर्ता अशी परिकल्पना करतो की, रा.तु.म. नागपूर व गोडंवाना विद्यापीठ गडचिरोली महाविद्यालयातील संलग्नीत शारीरिक शिक्षण प्राध्यापंकाचे खेळाडूना प्रोत्साहन आणि वैज्ञानिक व तंत्रशुध्द ज्ञानाचा वापर हा समाधान कारक राहिल.

### *नियंत्रित घटक :—*

सामाजीक बाबी, विद्यापीठ कार्य, प्रामाणिकता, जबाबदारी, किडा कार्यक्रमांचे आयोजन, चर्चासत्र, कार्यशाळा.

### *संशोधन कार्य पध्दती :—*

प्रस्तूत संशोधन अध्ययनामध्ये ''(urvery Method ) पध्दतीचा उपयोग करण्यात आला आहे. त्याचप्रमाणे संशोधनाची साधन म्हणून प्रश्नावली आणि मुलाखत अनुसुची आकडयाचे एकत्रीकरणाचा उपयोग करण्यात आला आहे. प्राप्त आकडयाचे एकत्रीकरण करून मुल्यमापन करण्यात आले आहे आणि साधा यादृच्छीक ''(imple Randam Sampding) पध्दतीने निदण्यात आले आहे आणि यामध्ये (नागपूर, वर्धा, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर व गडचिरोली) या जिल्हयांचा शारीरिक शिक्षण प्राध्यापकांचा समावेश करण्यात आला आहे.

### *माहितीचे सांख्यिकीय विश्लेषण :—*

सांख्यिकीय तंत्रातील विविध ग्राहता चाचणीचा मुल्यमापन करून त्या आधारावर निष्कर्ष काढले गेले आणि प्राप्त माहितीवरून वारंवारीता Frequency बहुलक काढण्यात आले. संशोधनाचा आराखडा लक्षात घेता Chi, Square TEST चा वापर करण्यात आला. Significance Level 0.05 ठेवण्यात आला आहे.


### **Findings** :—

संशोधनकर्त्याने संशोधनासाठी घेतलेल्या विषयाचे थ्यदकपदहे हे प्राप्त माहितीच्या आधारावर पुढील सारणी व आलेखात प्रस्तूत केली आहे.

*प्राध्यापकांचे खेळाडूना मिळण्या—या प्रोत्साहन संबधी मुल्याकनं*

| प्रतिकीया | शारीरिक शिक्षण संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| उच्च | **260** | **86.07** |
| **मध्यम** | **40** | **13.03** |
| **साधारण** | — | — |
| **एकुण** | **300** | **100** |

### प्राध्यापकांचे खेळाडूना मिळणाऱ्या प्रोत्साहन संबधी माहिती






वरील सारणी वरून रा.तु.म नागपूर व गोडंवाना विद्यापीठ गडचिरोली विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयातील कार्यरत शारीरिक शिक्षण प्राध्यापकाची प्रोत्साहनात्मक संबधी माहिती दर्शविण्यात आली आहे. माहितीनुसार 86.07 टक्के प्राध्यापकांकडून उच्च प्रतीचे प्रोत्साहन मिळत असून 13.3 टक्के हे प्राध्यापकांचे खेळाडुंना प्रोत्साहन हे मध्यम प्रतीचे मिळत असल्याचे निदर्शनास आले आहे. दोन्ही विद्यापीठातील प्राध्यापंकाचे प्रोत्साहनात्मक कार्य हे उच्च प्रतीचे आहे.

### प्राध्यापकांचा वैज्ञानिक व तंत्रशुध्द ज्ञानाचा खेळामध्ये वापर :–
### सारणी

| कार्याचे स्वरूप | शारिरीक संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| उच्च | 62 | 20.7 |
| साधारण | 208 | 69.3 |
| निम्न | 30 | 10.0 |
| एकुण | 300 | 100 |





### वैज्ञानिक व तंत्रशुध्द ज्ञानाचा खेळामध्ये वापर :–

वैज्ञानिक व तंत्रशुध्द ज्ञानाचा खेळांमध्ये वापर करण्यासबंधी रा.तु.म. नागपूर विद्यापिठ व गोडंवाना विद्यापीठ गडचिरोली विद्यापीठाशी संलग्नीत महाविद्यालयात कार्यरत शारीरीक शिक्षकांचा वैज्ञानिक व तंत्रशुध्द ज्ञानाचा वापर हा या सारणीत माहिती दर्शविण्यात आली आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार 69.3 टक्के साधारण 10.0 टक्के निम्न आणि 20.7 टक्के उच्च प्रमाणात दर्शविण्यात आले आहे

आकडेवारीनुसार प्राध्यापकांचे वैज्ञानिक व तंत्रशुध्द ज्ञानाचा खेळामध्ये वापर हा साधारण (69.3) प्रतीचा प्राप्त झाले आहे.

### *परिकल्पना परीक्षण :–*

रा. तु. म. नागपूर व गोडंवाना विद्यापीठ गडचिरोली विद्यापीठाषी संलग्नीत महाविद्यालयातील शारीरिक शिक्षण प्राध्यापंकाचे खेळाडूना प्रोत्साहन आणि वैज्ञानिक तंत्रशुध्द पध्दतीचा वापर हा समाधान कारक आहे.

प्रस्तूत सशोधन कार्यात प्राप्त झालेल्या माहितीच्या सांख्यिकीय विश्लेषणावरून असे निदर्शनास येते की, या संशोधनासाठी वापरण्यात आलेली परिकल्पनेचा स्विकार करण्यात काही हरकत नाही.

### *निष्कर्ष :–*

1) रा.तु.म. नागपूर व गोडंवाना विद्यापीठ गडचिरोली विद्यापीठाशी संलग्नीत महाविद्यालयातील शारीरिक शिक्षण प्राध्यापकांचे प्रोत्साहनात्मक कार्य हे उच्च प्रतीचे आहे.

2) रा.तु.म. नागपूर व गोडंवाना विद्यापीठ गडचिरोली विद्यापीठाशी सलंग्नीत महाविद्यालयातील तंत्रशुध्द ज्ञानाचा वापर हा साधारण स्वरूपाचा आहे.

### *सुचना व शिफारशी :–*

1) महाविद्यालयातील शारीरीक शिक्षकासाठी आणि विद्यार्थ्यासाठी विद्यापीठाने प्रोत्साहन कार्यक्रमाचे उपक्रम राबवण्यात यावे.

2) महाविद्यालयातील प्राध्यापकांसाठी तज्ञ मार्गदर्षक नेमण्यात यावे.

3) संषोधनाचे क्षेत्र वाढवून हेच संषोधन राज्य व राष्ट्रीय स्तरावर राबवण्यात यावे.

4) वैज्ञानिक व तंत्रशुध्द ज्ञानाचा क्षेत्र वाढवण्यासाठी त्मतिमीपदह ब्वनतेम हा राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील तज्ञ मार्गदर्शक किंवा खेळाडूकडून शारीरिक शिक्षण प्राध्यापकांना मार्गदर्शन देण्यात यावे.

### *संदर्भ ग्रंथ सूची*

1. देवेंद्र सिंग पाल 'शारीरिक शिक्षकत्व एवं इतिहास', प्रथम संस्करण, फेन्डस पब्लिकेशन 1997

2. Kundle DR. M.B. :- Education philosophy and education psychology', Shri Vidya Prakashan, Ravivar Peth, pune 1990 page no 6

3. Prof.P.ABorgave,''Direction of physical education his role in the promotion of physical education programmes at the college level',International congress-98 on Manangement of physical Education and sports,P.150-156

4. सिहं समय, खेल मनोविज्ञान, प्रेरणा प्रकाषन, नई दिल्ली प्रथम संस्करण 2012

5 Young P.V,Scientific Social survey and Research ,P.509



*अब्दुल निसार शेख*
*पदव्युत्तर शारीरिक शिक्षण विभाग, रा.तु.म. नागपूर विद्यापिठ, नागपूर.*